**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ३१ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **"प्रधानमंत्री किसान संपदा योजनेसाठी एकूण ६ हजार ५२० कोटी रुपयांच्या निधीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता, नागपूर-ईटारसी चौथ्या रेल्वे लाईनला देखील मंजुरी.**
2. **मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सात आरोपींची ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता.**
3. **भारत-इंग्लंड दरम्यान अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला अंतिम सामना सुरु, डळमळीत सुरवाती नंतर भारताची सावध खेळी.**
4. **राष्ट्रसेविका समितीच्या माजी प्रमुख संचालिका प्रमिलताई मेढे यांचं आज नागपुरात निधन.**

**-----------------------------------------------**

केंद्रीय मंत्री मंडळ बैठक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत १५ व्या वित्त आयोगाच्या चक्र (FCC) (२०२१-२२ ते २०२५-२६) दरम्यान चालू असलेल्या केंद्रीय क्षेत्रातील "प्रधानमंत्री किसान संपदा योजने" साठी १ हजार ९२० कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चासह एकूण ६ हजार ५२० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे अशी माहिती, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैश्णव यांनी दिली. मंजुरीमध्ये घटक योजनेअंतर्गत ५० बहु-उत्पादन अन्न विकिरण युनिट्सच्या स्थापनेला पाठिंबा देण्यासाठी १००० कोटी रुपये - एकात्मिक शीत साखळी आणि मूल्यवर्धन पायाभूत सुविधा आणि घटक योजनेअंतर्गत NABL मान्यता असलेल्या १०० अन्न चाचणी प्रयोगशाळा, अर्थसंकल्पीय घोषणेशी सुसंगत आणि १५ व्या FCC दरम्यान PMKSY च्या विविध घटक योजनांअंतर्गत प्रकल्पांना मंजुरी देण्यासाठी ९२० कोटी रुपये समाविष्ट आहेत. याशिवाय नागपूर इटारसी 297 किलोमीटरच्या चौथ्या रेल्वे लाईनला देखील आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून याचा खर्च 5 हजार 451 कोटी रुपये इतका अंदाजित आहे . यामुळे प्रवाशांसह मालवाहतूक देखील सुकर होणार असून याचा नागपूर आणि मध्य प्रदेश मधील नर्मदापुरम बेतुल आणि पांढुर्णा या स्थानकांना लाभ होणार आहे

***(होल्ड बाईट - रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव)***

***ऑलरेडी, इटारसी से नागपुर के बीच में डबल लाइन है, थर्ड लाइन का काम चल रहा है और अभी ये फोर्थ लाइन आज सेनशन हुई है। फोर्थ लाइन के होने से वो एरिया पूरा डीकन्जेस्ट हो जाएगा। वहाँ पे और ट्रैफिक फ्लो हो पाएगा। कैपेसिटी बढ़ेगी, करीब 10 मिलियन टन एडिशनल कार्गो आएगा। बहुत कॉम्प्लेक्स है ये सेक्शन इसमें 36 मेजर ब्रिजेस आ रहे हैं, 415 माइनर ब्रिजेस आएँगे। दो फ्लाईओवर है, 74 अंडर पासेस है, चार टनल्स है और दो रेल फ्लाईओवर है।***

---------------------------------------------------

इंटरसिटी सुपरफ़ास्ट एक्सप्रेस

नागपूर ते अमरावती दरम्यान 174 किलोमीटरचे अंतर आहे. या एवढ्या कमी अंतरावर शयनयान, एसी थ्री टिअरच्या डब्यांना प्रवासी मिळत नसल्याने या इंटरसिटी एक्सप्रेसला दोन स्लीपर, एक एसी तीन टियर इकॉनॉमी आणि एक एसी चेयर कार उपयोगात आणल्या जात नव्हत्या. नागपूर आणि अमरावतीला जोडणारी अजनी-अमरावती इंटरसिटी सुपरफास्ट एक्सप्रेसचे हे डबे आता प्रवाशांसाठी खुले केले जाणार आहेत. मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात चालवल्या जाणाऱ्या गाडी क्रमांक 12199/12120 अमरावती-अजनी-अमरावती एक्सप्रेसमध्ये प्रवाशांना आता अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रेल्वे प्रशासनाने या चार डब्यांना 1 ऑगस्ट पासून तीन महिन्यांच्या प्रयोगात्मक कालावधीसाठी सर्वसामान्य प्रवाशांच्या आरक्षणासाठी खुलं करण्याचा निर्णय घेतला आहे.

---------------------------------------------------

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा पुढचा हप्ता 2 ऑगस्ट रोजी वितरित केला जाणार आहे. केंद्रिय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली आज या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत  योजनेचा लाभ सुनिश्चित करण्या संदर्भात  बैठक घेण्यात आली. पीएम किसान निधी वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात वाराणसी इथे होणार आहे.

---------------------------------------------------

मालेगाव बॉम्बस्फोट- निर्दोष मुक्तता

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व सात आरोपींची आज विशेष एनआयए न्यायालयाने ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. सुमारे १७ वर्षे चाललेल्या या प्रदीर्घ खटल्यानंतर न्यायालयाने हा आदेश दिला. आरोपींमध्ये माजी भाजप खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा समावेश आहे. सरकारी वकिलांनी कोणताही ठोस पुरावा सादर न केल्यामुळे सर्व

आरोपींना निर्दोष मुक्त करत असल्याचं विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आपल्या निकालात नमूद केलं. २००८ मध्ये महाराष्ट्रात नाशिक जिल्हयामध्ये मालेगाव इथं हा बॉम्बस्फोट झाला होता. त्यात सहा जणांचा मृत्यू झाला तर १०० हून अधिक जण जखमी झाले होते. या प्रकरणाचा सुरुवातीचा तपास एटीएस अर्थात दहशतवाद विरोधी पथकानं केला होता. या प्रकरणी १२ जणांना अटक झाली होती. त्यानंतर हा तपास एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आला होता. या प्रकरणातला अंतिम युक्तिवाद एप्रिल २०२४ मध्ये संपला आणि न्यायालयानं १९ एप्रिल रोजी या खटल्याचा निकाल राखून ठेवला होता. खटल्यातल्या १२ आरोपींपैकी ३ जणांची यापूर्वीच निर्दोष सुटका झाली होती. तर दोन आरोपींवर फक्त शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत खटला चालवला जाईल, असं न्यायालयानं आज स्पष्ट केलं. या निकालावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. दहशतवाद कधीच भगवा नव्हता आणि नसेल, असं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. न्यायाला उशीर झाला हे खरं असलं तरी सत्य कधीच पराभूत होत नाही, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. तर मालेगाव प्रकरणातलं सत्य बाहेर आलं असून आता काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. मुंबई रेल्वे स्फोटाच्या निकालावर राज्य सरकार सुप्रीम कोर्टात जाणार आहे तसेच मालेगाव बॉम्बस्फोटाच्या निकालावरही सुप्रीम कोर्टात जाणार का, हे स्पष्ट करावे असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. मालेगावात बॉम्बस्फोटाच्या निकालावर ते पत्रपरिषदेत बोलत होते.

---------------------------------------------------

रानभाजी महोत्सव

आदिवासी भागामध्ये पावसाळ्यामध्ये उपलब्ध असलेल्या पारंपारिक रानभाज्या, रानफळे, वनऔषधे एकत्र करुन, शहरी भागातील लोकांना रानभाज्यांचे आयुर्वेदिक आणि त्यामध्ये उपलब्ध असलेली पोषणमुल्ये यांचे महत्व पटवून देणेसाठी तसेच आदिवासी बांधवांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याकरिता रानभाजी महोत्सव" कार्यक्रमाचे आयोजन प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, आदिवासी विकास भवन येथे करण्यात आले होते- त्या बद्दल ऐकुया अधिक माहिती..

***(होल्ड बाईट - २८ सेकंद)***

***या उपक्रमाच्या माध्यमातून या रानभाज्या आज त्यांना या एका छताच्या खाली मिळत आहे आणि इंडायरेक्टली या माध्यमातून एक पोषणमूल्य सुद्धा जे शहरी भागातील लोक आहेत. त्यांना या भाज्यांच्याविषयी एक माहिती नाही किंवा***

***त्याच्याबद्दल जनजागृती नाही आहे तर या माध्यमातून एक मिळतो आणि निश्चितच त्याचा फायदा हा आमच्या शहरी भागातील आणि जे वनामध्ये राहणारे आणि छोटे मोठे जे व्यावसायिक भाजी विक्रेते आहे. त्यांना सुद्धा याचा एक आर्थिक फायदा यानिमित्ताने या ठिकाणी मिळत आहे.***

---

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट

भारत आणि इंग्लंड यांच्यात अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आज लंडनच्या केनिंग्टन ओव्हल मैदानावर सुरु आहे. इंग्लंडच्या संघाने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारताचे सलामीचे फलंदाज यशस्वी जयस्वाल दोन धावांवर तर केएल राहुल 14 धावा करू शकले. त्यांना अनुक्रमे एटकीनसन आणि वोक्स यांनी बाद केलं. त्यानंतर भारताची बाजू सावरत आणि सावध खेळी करत साई सुदर्शन आणि कर्णधार शुभमन गिल सध्या खेळत आहे. शेवटच वृत्त हाती आल तेव्हा भारताच्या 23 षटकात 2 गडी बाद 72 धावा झाल्या होत्या. दरम्यान मालिकेतला चौथा सामना अनिर्णित राहिल्यामुळं सध्या इंग्लडकडे 2-1 अशी आघाडी आहे. अंतिम सामन्यात विजय मिळवून मालिकेत बरोबरी साधण्याची संधी भारताला आहे.

---

प्रमिलताई मेढे-निधन

राष्ट्रसेविका समितीच्या माजी प्रमुख संचालिका प्रमिलताई मेढे यांचं आज नागपुरात वार्धाक्यानं निधन झालं. त्या ९७ वर्षांच्या होत्या. त्यांचं पार्थिव नागपूरच्या देवी अहल्या मंदिरात अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आलं आहे. प्रमिलताईंच्या इच्छेनुसार त्यांचा देह एम्स रुग्णालयाला दान करण्यात येणार आहे. राष्ट्र सेविका समितीच्या माध्यमातून त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी भरीव कार्य केलं. १९७८ पासून कार्यवाहिका म्हणून तर २००३ ते २००६ या काळात प्रमुख संचालक पद त्यांनी भूषवलं. त्यांना नागपूर विद्यापीठाने डीलिट ने सन्मानित केलं होतं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी आज सकाळी प्रमिलताई मेढे यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या....

***(होल्ड बाईट - सरसंघचालक डॉ.मोहन भागवत २२ सेकंद)***

***प्रमिलताई गेल्या, आमच्या डोक्यावरचं छत्र हरपल्यासारखी भावना आमची झालेली आहे. त्यांनी निष्ठापूर्वक इतके वर्ष जे समितीचे काम केल आहे, त्यांनी परिश्रमाचा, तपस्येचा, समर्पणाचा सगळेच आदर्श आपल्या जीवनानी आमच्या समोर उभे केलेले आहे. ते आता हटणार नाहीत. त्यांच्या तर त्या अधिकारामुळे त्यांना सद्गती मिळणारचं आहे. आम्हाला धैर्य मिळो अशीच प्रार्थना आम्ही करतो.***

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रमिलताईंच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. स्वयंसेवकांनी मातृतुल्य व्यक्तिमत्व गमावलं असल्याचं त्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे. भारतभर फिरुन राष्ट्र सेविका समितीचं कार्य देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी प्रमिलताई मेढे यांनी केलेल्या प्रयत्नांचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात केला असून आदरांजली वाहिली आहे.

-----------------------------------------------